# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया


जा.क्र. :— 20/शि.वि./सशिअ

दि. — 28/04/2014

**महत्वाचे**

प्रति,

सर्व मुख्यध्यापक/मुख्याध्यापिका,
मराठी/हिंदी/उर्दू/इंग्रजी प्राथमिक शाळा
म.न.पा. नागपूर

विषय :— प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2012 संदर्भात इ. 3री व 4थी प्रशिक्षणासाठी शिक्षकांची निवड करून नावे कळविण्याबाबत.

संदर्भ :— जा. क्र. मराशैसप्रप/अविवि/शिप्र/2014—15/1249, दि. 21/4/ 2014.

सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता संवर्धनासाठी अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. परिषदेच्या अभ्यासक्रम विकसन विभागामार्फत NCF-2005, RTE-2009 SCF-2010, नुसार राज्याचा प्रचलित अभ्यासक्रम पुनर्रचित करण्याचे काम पूर्ण झाले असून प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2012 — इ.1ली ते 8 वी च्या अभ्यासक्रमास शासन निर्णय क्रमांक पीआरई—1411/(175/11) प्राशि—5 दिनांक 28.12.2012 अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2012 ची अंमलबजावणी इ. 1ली व 2 री साठी सन 2013—14 या शैक्षणिक वर्षापासून करण्यात आलेली आहे. सन 2014—15 या शैक्षणिक वर्षापासून इ. 3 री व 4 थी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी यशस्वी व परिणामकारक व्हावी या हेतूने सर्व शिक्षा अभियान अंतर्गत इ.3री व 4थी ला शिकविणा—या सर्व प्राथमिक शिक्षकांसाठी राज्यव्यापी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने मनपास्तरावर मराठी माध्यमा बरोबर उर्दू व इंग्रजी व हिंदी या प्रथम भाषेची प्रशिक्षण खालील नियोजना नूसार आयोजित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | स्तर | इयत्ता | प्रशिक्षणाचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | जिल्हा | 3 री | दि. 9 जून ते 13 जून 2014 |
| 2 | जिल्हा | 4 थी | दि. 16 जून ते 21 जून 2014 |
| 3 | तालुका/मनपा | 3 री | दि. 23 जून ते 27 जून 2014 |
| 4 | तालुका/मनपा | 4 थी | दि. 30 जून ते 04 जुलै 2014 |

उपरोक्त कालावधीत जिल्हास्तरावर प्रशिक्षणाचे आयोजन करावयाचे असल्याने आपल्या शाळेत उत्कृष्ट काम करणा–या शिक्षकांची जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी साधनव्यक्ति म्हणून निवड करावयाची असल्याने खालील निकषानूसार नावे पाठविण्यात यावी.

**जिल्हास्तरावर प्रशिक्षणाचे निकष :–**

1. अति उत्कृष्ट अनुभवी शिक्षक / किमान 10 वर्ष अध्यापनाचा अनुभव असणारा असावा.
2. वय 50 वर्षा पेक्षा कमी असावे.
3. निवड केलेली व्यक्ति सेवेत असावी.
4. विषया संबंधी आवड व उत्कृष्ट कामगिरी करणा–या शिक्षकांची निवड करावी.

जिल्हास्तरावर प्रशिक्षणासाठी शिक्षकांची नावे माध्यम निहाय / विषय निहाय दि. 10 मे, 2014 पर्यंत शिक्षण विभागात मा. सहा. शिक्षणाधिकारी सौ. कुसूम चाफलेकर यांच्याकडे सादर करावी.

**मनपास्तरावर / तालुकास्तरावर :–** उपरोक्त कालावधीत आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी सन 2014–15 मध्ये ज्या शिक्षकाकडे इ. 3 री व 4 थी चे अध्यापनाचे वर्ग राहणार आहेत, अश्या शिक्षकांची नांवे मनपातील कार्यरत आपल्या अधिनस्त शहर साधन केंद्रातील समन्वयक श्री. राजेंद्र धाईत, श्री. शेषराव उपरे व श्री. संजय भाटी यांच्याकडे दि. 15 मे, 2014 पर्यंत देण्यात यावी. ज्या शिक्षकांची नांवे प्रशिक्षणासाठी निवड केलेली आहेत, अश्या शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण केल्या नंतर 3 री व 4 थी ला अध्यापन करावे लागणार आहे. त्याअनुषंगाने शिक्षकांची नावे देण्यात यावी. याबाबत या कार्यालयास तक्रार प्राप्त झाल्यास सर्वस्व जबाबदारी आपणांवर निश्चित करण्यात येईल. जिल्हा / तालुकास्तरावरील प्रशिक्षणाचे स्थळ / वेळ हे स्वंतत्ररित्या कळविण्यात येईल याची नोंद घ्यावी. निवड केलेल्या शिक्षकांना प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक असल्याने उपरोक्त कालावधीत शिक्षकांच्या अर्जित रजा किंवा किरकोळ रजा मंजूर करण्यात येवू नये.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

**प्रतिलिपी –**

1. मा. संचालक, मराशैसं व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद). पुणे 30.
2. मा. अपर आयुक्त, मनपा, नागपूर
3. मा. उपायुक्त, मनपा. नागपूर
4. सहा. शिक्षणाधिकारी, म.न.पा. नागपूर
5. ..............................शहर साधन समन्वयक, सशिअ., मनपा. नागपूर.